दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २२२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२४ मार्च २०२५





## थोडक्यात

### कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द उत्पादकांना दिलासा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** केंद्र सरकारने देशभरातील कांदा उत्पादकांना दिलासा देत कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिलपासून होणार आहे. या निर्णयामुळे कांद्याची निर्बंधमुक्त निर्यात करता येणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील कांदापट्ट्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

केंद्र सरकारच्या ग्राहक कल्याण मंत्रालयाने शनिवारी याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. केंद्र सरकारने देशांतर्गत कांद्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आणि कांद्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी कांद्यावर निर्यात शुल्क आणि किमान निर्यात मूल्य लागू केले होते, त्यानंतर ८ डिसेंबर २०२३ ते ३ मे २०२४ या पाच महिन्यांत निर्यात बंदी लागू केली होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कांद्यावरील निर्यात बंदी आणि किमान निर्यात मूल्याचे निर्बंध उठवण्यात आले होते. पण, १३ सप्टेंबरपासून २० टक्के निर्यात शुल्क लागू करण्यात आले होते. निर्यात बंदी किमान निर्यात मूल्य आणि निर्यात शुल्कामुळे कांद्याच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला होता. वर्ष २०२३ – २४ मध्ये एकूण १७.१७ लाख टन कांद्याची निर्यात झाली होती, तर आर्थिक वर्ष २०२४ –२५ मध्ये १८ मार्चअखेर ११.६५ लाख टन कांद्याची निर्यात झाली आहे.

### संतनगरीत दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**


**दि.२३, बुलडाणा :** सध्या महाराष्ट्रात मुघल शासक औरंगजेबाची कबर आणि त्यावरून मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्या नागपूर शहरात उसळलेल्या हिंसक दंगलीवरून राज्यातील सामाजिक, राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. आता या संवेदनशील प्रकरणावरून समाजविरोधी व्यक्तींनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट टाकून सामाजिक वातावरण कलुषित करण्याचा खोडसाळपणा केला जात आहे. याला विदर्भ पंढरी म्हणून प्रख्यात शेगाव नगरी सुद्धा अपवाद ठरली नाही! दंगलप्रकरणी सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर अपलोड करीत दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच युवकांना शेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. शेगांव पोलिसांनी सोहेल खान साहेब खान (२२, रा. अशपाक उल्ला चौक, शेगाव), नागेश श्रीकृष्ण कळसकार (२९, रा. व्यंकटेश नगर, शेगाव), मो. सलमान मो. लियाज (१९, रा. बाजार फैल), मो. उमर मो. शोएब (१८, रा. पुरुषोत्तम पाटील नगर, शेगाव), शुभम विठ्ठल ढगे (२९, रा. एसबीआय कॉलनी, शेगाव) यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. पोलीस हवालदार संजय करुटले यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६,१३५(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर हजर केले जाणार आहे. पुढील तपास ठाणेदार पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार संजय करुटले करीत आहेत.

# सुशांतसिंग राजपुतची हत्या नसून आत्महत्याच, सीबीआयचा अंतिम अहवाल !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नागपूर :** प्रसिध्द अभिनेता सुशांतसिंग राजपुत यांनी २०२० मध्ये आत्महत्या केली होती. परंतु, बिहारच्या निवडणुकीमध्ये फायदा होण्यासाठी त्यांची आत्महत्या नसून हत्या करण्याचा आरोप करण्यात आला होता. याचा तपास मुंबई पोलिसांनी केला असता त्यात स्पष्टपणे समोर आले की, त्याने आत्महत्याच केली. नंतर हा तपास सीबीआयला देण्यात आला. सीबीआयचा अंतिम अहवाल आता समोर आला असून त्यांनी मुंबई पोलिसांच्या तपासावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यानुसार सुशासिंग राजपुत याने आत्महत्याच केल्याचे समोर आले असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे नेते व तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.

मी राज्याच्या गृहमंत्री असतांना सुशांतसिंग राजपुत यांनी आत्महत्या केली होती. परंतु तेव्हाच्या विरोधकांनी आरोप केला होता की, राजपुत यांची आत्महत्या नसून त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणाचा तपास बांद्रा पोलिसांनी सुरू केला. तपास सुरू असताना अनेक बाबी समोर आल्यानंतर मी वारंवार सांगत होतो की, सुशांतसिंग यांची हत्या झाली नसून त्यांनी आत्महत्या केली आहे. यानंतर मुंबई पोलिसांचा तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आपला अहवाल सादर केला. त्यातही सुशांतसिंग यांची हत्या करण्यात आली नसून त्यांनी आत्महत्याच केल्याचे समोर आले होते. सुशांतसिंग हा मुळचा बिहारचा होता. आणि त्यांचा आत्म



हत्येचा फायदा बिहारच्या विधानसभा निवडणुकीत कसा घेता येईल यासाठी विरोधकांकडून हत्या झाल्याचा आरोप करण्यात आला. सुशांतसिंग यांच्या वडीलांनी पाटणा येथे तक्रार देऊन सुशांतसिंग याची हत्या करण्यात आल्याची तसेच रिया चक्रवर्ती हिने १५ कोटी रुपये हडप केल्याचा आरोप केला होता. यावरुन या प्रकरणाचा तपास हा सीबीआयला देण्यात आला. आता सीबीआयचा अंतिम अहवाल आला असून यात सुशांतसिंग यांची हत्या करण्यात आली नसून आत्महत्याच असल्याचे समोर आल्याने तेव्हाचा मुंबई पोलिसांनी केलेला तपास हा योग्य होता असेही अनिल देशमुख यावेळी म्हणाले.

**रिया चक्रवर्तीला क्लिनचीट**

अभिनेता सुशांत सिंह राजपूत आत्महत्या प्रकरणात रिया चक्रवर्तीला क्लिनचीट देण्यात आली आहे. सुशांत सिंह राजपूत याने आत्महत्याच केल्याचे सीबीआयच्या क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले आहे. रिया चक्रवर्ती विरोधात कुठलाही पुरावा न सापडल्याने तिला क्लिनचीट देण्यात आली आहे. तब्बल चार वर्ष चार महिन्यांनी सीबीआयकडून कोर्टात क्लोजर रिपोर्ट सादर करण्यात आला आहे, त्यामध्ये सुशांत सिंह राजपूत याने आत्महत्याच केल्याचे म्हटले आहे.

# देऊळगाव महीमध्ये अग्नी तांडव, चार दुकाने जळाली, तीस लाखांची हानी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, बुलडाणा :** देऊळगाव राजा तालुक्यातील आणि राष्ट्रीय महामार्गांवर असलेल्या देऊळगाव मही येथे रविवारी लागलेल्या भीषण आगीत चार दुकानातील विविध साहित्याची मोठी हानी झाली. या भीषण दुर्घटनेत तीस ते पस्तीस लाख रुपयांचे नुकसान झाले. घटनेने जबर मानसिक धक्का बसलेल्या एका दुकानदाराची प्रकृती बिघडली.

दुकान ओळीतील चिखली- जालना मार्गावर संदीप किराणासह अन्य तीन दुकानाला आज २३ मार्च रोजी रविवारला अचानक भीषण आग लागली.या आगीत लाखों रुपयांचे नुकसान झाले आहे.ही शॉटसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. या आगीच्या घटनेमुळे



स्थानिक नागरिकांची एकच तारांबळ उडाली होती. शिवाजी विद्यालया समोर विजय श्रीराम शिंगणे यांच्या मालकीचे संदीप होलसेल व चिल्लर विक्रीचे किराणा दुकान आहे. संजय प-हाड यांचे फायबर फर्निचर दरवाजे विक्रीचे दुकान तसेंच शेख.नसीम यांचे सायकल स्टोअर व सुनिल शिंगणे यांचे गोळ्या बिस्कीट अंडे, पाणी होलसेल विक्रीचे दुकान आहे. संदीप किराणा दुकानासह अन्य तीन दुकानें लागूनच असल्यामुळे कुठल्यातरी एका दुकानात शॉट सर्किट झाले असावे असा अंदाज आहे. हळू हळू आगीने पेट घेतल्याने आग पसरली.

भीषण आगीत रूपांतर होऊन काही क्षणातचं होत्याचे नव्हते झाले.चारही दुकानातील किराणा माल, नव्या जुन्या सायकल, टायर, ट्यूब मोटार सायकल टायर ट्यूब रिंगा फर्निचर दरवाजे, गोळ्या बिस्कीट पाणी बॉटल यासह अनेक साहित्य जळून खाक झाले आहे. याप्रसंगी आग विझाविण्यासाठी पाण्याच्या टँकरच्या मदतीने गावातील नागरिकांनी मोठ्या धाडसाने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. अग्निशमन गाडीला देखील पाचरण करण्यात आले होते. महसूल विभागाचे तलाठी संदीप वायाळ यांनी घटना स्थळचा पंचनामा केला असून प्राथमिक पंचनाम्यात अंदाजे तीस ते पस्तीस लाखांचे नुकसान झाल्याचे समजते. नुकसान ग्रस्त दुकान मालकाला शासनाकडून तात्काळ मदत मिळावी अशी मागणी होत आहे.

**दुकान मालकाची प्रकृती बिघडली**

अचानक लागलेल्या आगीमुळे किराणा दुकानातील किराणा माल व साहित्य पूर्णपणे आगीत जळून खाक झाल्याचे पाहून विजय श्रीराम शिंगणे (वय ४५) यांना चांगलाच धक्का बसला. त्यांना छातीमध्ये तीव्र वेदना जाणू लागल्या होत्या.त्यांच्यावर प्राथमिक देऊळगाव मही ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी डॉक्टरांनी जालना हलवण्याचे सांगितले.

# मलकापूर हादरले ! सिलिंडरचा स्फोट, एक ठार, दोघे गंभीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, बुलडाणा :** विदर्भाचे प्रवेश द्वार आणि खान्देश व मध्यप्रदेश राज्याच्या सीमेला लागून असलेल्या मलकापूर शहराची रविवारची दुपार शहर वासियांना हादरविणारी ठरली! ऑक्सिजन सिलिंडर चा भीषण स्फ़ोट होऊन एक इसम ठार झाला तर दोघे जन गंभीर जखमी झाले.

मलकापूर शहरातील लक्ष्मीनगर परिसरात हा खळबळजनक आणि तितकीच भीषण घटना घडली. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार घटनेची माहिती पुढीलप्रमाणे आहे. यानुसार लक्ष्मी नगर भागात आज रविवारी, २३ मार्च



रोजी दुपारी एका ऑटोमध्ये ऑक्सीजन सिलिंडर टाकत असताना अचानक स्फोट झाला. या स्फोटात एक जण ठार झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. सिलिंडर चा स्फ़ोट नेमका कश्यामुळे झाला हे कळू शकले नाही.

प्राथमिक माहितीनुसार, ऑटोमध्ये ऑक्सिजन सिलिंडर ठेवत असताना गॅस गळती किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे हा स्फोट झाला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. स्फ़ोटाचा जोरदार आवाज एकटाच परिसरातील नागरिकांनी आवाजाच्या दिशेने धाव घेतली. घटना स्थळीचे दृश्य मनाला हेलावून टाकणारे होते. नागरिकांनी जखमींना दिलासा दिला. त्यानंतर जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनास्थळी मलकापूर पोलीस दाखल झाले असून स्फ़ोट नेमके कश्यामुळे झाला याचा तपास करण्यात येत आहे.

## शेवगा, ढोबळी मिरची, फ्लॉवर, भुईमुग शेंगाच्या दरात घट, हिरवी मिरचीच्या दरात वाढ

**दि.२३, पुणे :** शेवगा, ढोबळी मिरची, फ्लॉवर, भुईमुग शेंगाच्या दरात घट घट झाली. हिरवी मिरचीच्या दरात वाढ झाली असून अन्य फळभाज्यांचे स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक कमी झाली आहे. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ५ ते ६ टेम्पो गाजर, हिमाचल प्रदेशातून एक ट्रक मटार, कर्नाटकातून २ ते ३ टेम्पो भुईमूग शेंग, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटकातून ५ ते ६ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात आणि मध्य प्रदेशातून १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ५५० ते ६०० गोणी, भेंडी ६ ते ७ टेम्पो, गवार २ ते ३ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी १० ते १२ टेम्पो, कोबी ७ ते ८ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा १०० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ६० ते ६५ टेम्पो बटाट्याची आवक झाली.

# मुंबईत पनवेल लोकल आता, बोरिवली विरारपर्यंत धावणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, मुंबई :** बोरिवली आणि विरार परिसरातील नागरिकांना पनवेल गाठण्यासाठी आता थेट मुंबई उपनगरी रेल्वे अर्थात मुंबई लोकल उपलब्ध होणार आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने 'एमयूटीपी ३ ब'मध्ये पनवेल-वसई उपनगरी रेल्वे प्रकल्पाचा समावेश केला आहे. पनवेल-वसई लोकल धावल्यानंतर त्याचा विस्तार बोरिवली- विरारपर्यंत करणे शक्य होणार आहे. यामुळे लाखो प्रवाशांचा प्रवास आणखी वेगवान होणार आहे.

मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या 'एमयूटीपी ३ ब' प्रकल्प संचामध्ये नवीन पनवेल-वसई उपनगरी रेल्वे मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. वसई पासून पुढे बोरिवली आणि विरार अशा दोन्ही दिशांना याची जोडणी असणार आहे, असे मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विलास वाडेकर यांनी सांगितले.

नवी मुंबईतील नव्या विमानतळापासून पनवेल रेल्वे स्थानक सुमारे १० मिनिटांच्या अंतरावर आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून पनवेलपर्यंत हार्बर लोकल धावते. पनवेल-कर्जत नव्या रेल्वे प्रकल्पात सध्या रुळांची उभारणी सुरू आहे. मेट्रो ८ मुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई विमानतळा दरम्यान मेट्रोचा पर्याय मुंबईकरांना उपलब्ध होणार आहे. यामुळे तिन्ही मार्गांवरील रेल्वेसह मेट्रोची जोडणी असल्याने रेल्वे प्रवाशांसह विमानतळावर ये-जा करणाऱ्या प्रवाशांनाही याचा लाभ घेता येणार आहे.

'एमयूटीपी'अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या रेल्वे प्रकल्पात राज्य आणि केंद्र सरकारकडून ५०:५० प्रमाणे निधी दिला जातो. नवीन पनवेल-वसई लोकल मार्ग सुरू करण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाबाबत राज्य सरकारशी प्राथमिक बैठका पार पडल्या आहेत. महा मुंबईतील प्रवाशांचा प्रवास जलद करणाऱ्या या प्रकल्पाला राज्य सरकारकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. लवकरच अंतिम बैठका घेऊन नवीन रेल्वे प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात येणार आहे, असेही वाडेकर यांनी सांगितले.

महा मुंबईत केवळ पनवेल-दिवा-वसई मार्गावर मुंबई लोकल धावत नाही. सध्या मेमू रेल्वे धावत असून, त्याच्या मोजक्याच फेऱ्या होतात. यामुळे पनवेल-वसई लोकल सुरू करण्याची मागणी सातत्याने प्रवाशांनी लावून धरली आहे. लोकल सुरू झाल्यानंतर या परिसरातील वेगवान विकासाचा मार्ग प्रशस्त होणार आहे, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.




## जरा याद करो कुर्बानी...

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

# सुजाण पालकत्व !!

आज समाजात सतप्रवृत्तीच्या लोकांपेक्षा अपप्रवृत्तीच्या लोकांची संख्या जास्त आहे.' असं नेहमी म्हटलं जातं. पुढे असंही म्हटलं जातं की, 'चांगल्या लोकांमुळे ही समाजव्यवस्था टिकून आहे. आणि चांगली लोकं संख्येने खूप कमी आहेत. ' अशी वाक्य लोकांच्या बोलण्यातून ऐकायला मिळतात. यामध्ये कितपत सत्य आहे हे तपासण्याची यंत्रणा आपल्याकडे नसली, तरी समाजस्वास्थ्य बिघडल्या मुळे अनेक घटना मात्र घडत असल्याचे दररोज पाहायला, ऐकायला मिळत आहेत . समाजातील सतप्रवृत्तीचे लोक वाढले पाहिजेत, यासाठी काय करता येईल ? यावर विचार मंथन व्हायला हवे. सत प्रवृत्तीचे लोक वाढण्यासाठी पहिला उपाय हमखास हा सांगितला जाईल की, पालकांनी आपल्या बाल्यावस्थेतील आणि किशोर अवस्थेतील मुलांना चांगले संस्कार दिले पाहिजेत ! आज खेदाने असे म्हणावे लागत आहे की, पालकत्वामध्ये आपण कमी पडत आहोत... गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, महिला अत्याचारांच्या वाढत्या घटना, वाढते सायबर गुन्हे, वाहतुकीचे, स्वच्छतेचे, नीतिमत्तेचे नियम मोडणाऱ्यांची वाढती संख्या, कर बुडवे,कामचुकार, भ्रष्टाचारी,ऐतखाऊ, चंगळवादी, गैरमार्गी, काळाबाजारी अशा अनेक अप्रवृत्तीच्या लोकांनी समाज व्यवस्था पोखरून टाकली आहे. या लोकांना घडवण्याचे काम योग्य पद्धतीने झाले नव्हते, म्हणजेच त्यांचे पालकत्व योग्य पद्धतीने झालं नव्हतं असंच म्हणावं लागेल. घडवण्याचे काम फक्त मुलांचे आई वडील म्हणजेच पालक करतात असे नव्हे,तर शिक्षक, नातेवाईक आणि आजूबाजूचा समाज, प्रसार माध्यमे हेही मुलांचे चारित्र्य घडवत असतात. मुलांना संस्कार देण्याचे काम आई-वडिलांसोबत अप्रत्यक्षरीत्या हे घटक देखील करत असतात.असं असलं तरी आई-वडिलांकडून होणाऱ्या पालकत्वाबद्दल जास्त प्रमाणात विचार करणं आज महत्त्वाचं झालं आहे. मुलांचे संगोपन करताना आरोग्य, शिक्षण,आहार, संस्कार, संवाद याकडे पालकांना विशेष लक्ष द्यावे लागते. आजारपणात डॉक्टरांकडे घेऊन जाणे, त्यांना औषध उपचार करणे आणि त्यांची सेवा करणे हे पालकांचे आद्य कर्तव्यच असते. त्याच पद्धतीने आहारामधून सर्व अन्नघटक कसे मुलांना मिळतील याची काळजी पालकांनाच घ्यावी लागते. मुलांचे संगोपन करताना चांगल्या शाळेची निवड करणे, त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, अभ्यासातील कच्चे विषय पक्के होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, शिक्षणानंतर मुलांचा कल शोधण्याचे काम पालकांनाच करावे लागते. ज्या क्षेत्राकडे त्याचा ओढा आहे,त्या क्षेत्रातच मुलांना पाठवले पाहिजे, हा नियम पालकांनी ध्यानातच ठेवला पाहिजे. कारण पालकांच्या अपेक्षांचे ओझे मुलांना कधी कधी असह्य होते. त्यातून मुलांच्या आत्महत्याचे प्रकार घडतात. मुलांची बौद्धिक कुवत, भावनिकता ध्यानात घेऊनच त्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याचा निर्णय घेतला पाहिजे. या सर्व गोष्टी सोबतच संवाद आणि संस्कार या गोष्टी कडे पालकांनी विशेष लक्ष दिले पाहिजे. संवादातून संस्कार देण्याचे काम दररोज झाले पाहिजे. मुलांसमोर आपले वर्तन चोख ठेवण्याची दक्षता पालकांनी नेहमी घेतली पाहिजे. मुलांसमोर व्यसन करणे, खोटं बोलणे, परक्या व्यक्तींची चर्चा करणे या सारख्या गोष्टी टाळल्या पाहिजेत. मुलांचे सोबती कोण आहेत,यांच्याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. कारण मुले ही वाईट संगतीने जास्त बिघडतात. मुलांना संस्कार लावणे म्हणजेच त्यांना चांगलं ऐकायला, पाहायला देणे होय. त्यासाठी मुलांना चांगली पुस्तके वाचण्यास



दिली पाहिजेत. चांगले चित्रपट आणि नाटके दाखवली पाहिजेत. ग्रंथालयाचे सभासदत्व मिळवून दिलं पाहिजे. मुलांना शक्यतो स्वतंत्र मोबाईल देणं टाळलं पाहिजे. योग्य वयात योग्य लैंगिक शिक्षण दिलं पाहिजे. मोकळेपणाने यावर चर्चा करून त्यांना योग्य शब्दात माहिती दिली पाहिजे. अध्यात्म आणि नैतिक आचरण याची शिकवण देखील मुलांना दिली पाहिजे. थोरा मोठ्यांच्या गोष्टी मुलांना सांगितल्या पाहिजे. पर्यटन स्थळांना भेटी देताना प्रामुख्याने किल्ले, ऐतिहासिक वारसा आणि आयआयटी आणि आय आय एम सारख्या मोठमोठ्या शैक्षणिक संकुलांना भेटी दिल्या पाहिजेत. मुलांशी सतत संवाद झाला पाहिजे याची काळजी घेतली पाहिजे. या संवादातून मुलांना राष्ट्रीय एकात्मतेची, सहकार्य भावना वाढवण्याची, समानभूती, पर्यावरण महत्त्व, मानवतावाद, समाजवाद, भांडवलशाही, आंबेडकरवाद, गांधीवाद आणि मार्क्सवाद यासारख्या गहन विषयावर देखील चर्चा केली पाहिजे. पालक आपल्या पाल्यासोबत जितकी उच्च कोटीची चर्चा करतील, तितकी मुलांमध्ये जागृती, जाणीवा आणि संवेदनशीलता वाढीस लागेल. माझा मुलगा किंवा मुलगी उच्च पदावर गेली पाहिजे केवळ हेच स्वप्न न पाहता ; माझ्या मुला मुलीने उच्च जीवनमूल्य आत्मसाद करून निष्कलंक, निस्वार्थी, निष्कपट आणि समाज उपयोगी जीवन जगले पाहिजे. हा विचार पालकांनी केला पाहिजे. बाबा आमटे यांनी समाजसेवेत आपले संपूर्ण आयुष्य घालवले. त्यांची मुले आणि आता त्यांची तिसरी पिढी देखील याच कार्यात आपले योगदान देत आहे. म्हणजेच मुले ही अनुकरणातून शिकत असतात. म्हणून आपले अनुकरण मुलांसमोर आदर्श ठेवण्याची दक्षता पालकांनी नेहमी घेतली पाहिजे.

समाजातील अत्यंत हलाखीचे जीवन जगणाऱ्या पालकांना आपल्या पाल्यांना जाणीवपूर्वक संस्कार देणे शक्य होत नाही. त्यांची मुले वाईट मार्गाला लागण्याचा धोका मोठ्या प्रमाणात असतो. म्हणून झोपडपट्टीतील आणि दिवस-रात्र कष्ट करणाऱ्या लोकांच्या पाल्यांच्या संस्काराची जबाबदारी समाजाने घेतली पाहिजे. स्वतःच्या मुलांच्या संस्काराबरोबरच वंचित, उपेक्षित आणि दुर्बल घटकातील मुलांच्या संस्काराकडे देखील जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले पाहिजे. अशा भागात ग्रंथालये, अभ्यासिका आणि संस्कार केंद्रे उभारून स्वयंसवी संस्थांनी तेथील मुलांना संस्कारीत केले पाहिजे.

**- किशोर जाधव सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# राज्यमंत्री आशिष जैस्वाल, अशोक झिंगरे यांना शिवसेनेची मोठी जबाबदारी देणार..?

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्ह मिळाल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात विधानसभेत शिवसेनेने घवघवीत यश संपादन केल्याने शिवसेनेने विदर्भाकडे लक्ष केंद्रित केले आहे. विदर्भात संघटात्मक बांधणी करण्याची जबाबदारी वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्याकडे दिल्याची माहिती आहे.

याच विषयावर चर्चा करण्यासाठी २२ मार्च शनिवारला रात्री उशिरा राज्यमंत्री आशिष जैस्वाल सावनेर तालुक्याचे मध्यवर्ती कार्यालय खापरखेडा येथील शिवालय येथे दाखल झाले. यावेळी राज्यमंत्री आशिष जैस्वाल व माजी जिल्हा संघटक अशोक झिंगरे यांच्यात विविध विषयांवर राजकीय चर्चा झाल्याची माहिती मिळाली असून पुढील काळात अशोक झिंगरे यांच्यावर मोठी जबाबदारी दिली जाणार असल्याचे संकेत मिळाले आहे. शिवसेनेचे नेते माजी जिल्हा प्रमुख राजू हरणे, माजी जिल्हा संघटक अशोक झिंगरे यांनी उबाठा गट सोडून शेकडो कार्यकर्त्यांसह राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात नुकताच शिवसेनेत प्रवेश केला. माजी जिल्हा संघटक अशोक झिंगरे यांच्याकडे पक्ष संघटनेचा दांडगा अनुभव आहे. शिवसेनेत विविध पदावर कार्य करीत असताना त्यांनी हजारो शिवसैनिक तयार केलेत याची जाणीव शिवसेना नेत्यांना आहे त्यामुळे त्यांना शिवसेनेत मोठी जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे. यावेळी राजू बोरकर, दिनेश गुढधे, घनश्याम बिजेवार, कैलाश शिंगने, विनोद बिघाने, राहुल बागेडकर, प्रशांत नखाते, राजू मेश्राम, सुनील वैद्य, दिनेश बागडे, दिनेश झिंगरे, सुरेंद्र कच्छावे, देवा चौधरी, सुरेश पौणिकर, प्रफुल पांडे, मॉन्टी ठाकरे, मॉन्टी ठाकूर, मंगेश चोंढे, विक्रम कच्छावे, सुधीर फेंडर, योगेश निहारे, अंकित बक्सरिया, रवी मेश्राम, दुर्वास भुरकुंडे, जनार्धन तुरणकार, सुधाकर गावंडे, अंकित नारनवरे, सुरेश केने, सचिन गजभिये, विनोद नारनवरे, दीपक श्रीवास्तव, बलदेव श्रीवास्तव, नरेश भक्तते, राजू बर्वे, दिनेश सपाटे, प्रशांत नागदवने, जयंत झिगरे, विकास बारई, विकास झिगरे, नरेंद्र ईश्वरकर, अरविंद लोखंडे, शुभम झिंगरे, बबलू मित्तल, मिंकू मित्तल आदि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माणूस उणा...

स्वावलंबन महत्वाचे
जाणा जरा आपणा
कसे आहोत कळावे
पहा कधीतरी दर्पणां

कस्पटासमान बाकी
सोडायचा अहम्फणा
जरासा तो ढिलेपणा
अहंकार काढी फणा

संधी मिळे योध्यांला
शक्ती कळे रणांगणा
खिलाडू वृत्ती जाणते
खेळाच्या या प्रांगणा

स्वभावजरी लवचिक
हवा मात्र ताठ कणा
नका विसरणे मर्यादा
सन्मान करा कुंपणा

कृतज्ञता हा दागिना
विसरू नका रे ऋणा
औदार्या अंतःकरणा
उर्जीत करी सद्गुणा

प्रारब्धापुढे भाग्यवान
माणूस असे हा उणा
कर्तव्यमात्र हातीअसे
कर्तृत्व महत्त्व जाणा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६..**

# लालपरीच्या प्रवाशांचा यंदाचा उन्हाळी प्रवास होणार थंडगार

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.२२, मुंबई :** शाळांना सुट्टी लागल्यावर चिमुकल्या विद्यार्थी मित्रांना आणि सुट्टीवर जाणाऱ्या चाकरमान्यांना वेध लागतात ते आपापल्या गावी जाण्याचे. सध्या जरी परीक्षा सुरु असल्या तरी त्यानंतर लागणाऱ्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये गावी जाण्याचं प्लॅनिंग आतापासूनच झालं आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील परिवहन मंडळही सज्ज झालं असून यंदा गावी जाणाऱ्यांना सरप्राइज देण्याची तयारी एसटी महामंडळाने केली आहे. एसटी महामंडळ उन्हाळी सुट्टीत प्रवाशांना थंडगार प्रवासाचा अनुभव देण्याची तयारी पूर्ण केली आहे. राज्यभरात एकूण ८७२ वातानुकूलित शिवशाही बसेस उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांच्या सेवेत धावणार आहेत. उन्हाळ्यातील प्रवाशांची वाढती मागणी विचारात घेऊन एसटी महामंडळाने पुरेशा वातानुकूलित शिवशाही बसेस चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे गावी जाणाऱ्यांचा प्रवास गारेगार होणार हे निश्चित.

उन्हाळी सुट्टी दरम्यान मुंबई आणि उपनगरांमधून कोकण तसेच राज्याच्या इतर भागांत जाणाऱ्या चाकरमान्यांचे प्रमाण अधिक असते. एकीकडे रेल्वेने अतिरिक्त सेवा सुरू केली तरी राज्याच्या ग्रामीण भागात जाण्यासाठी प्रवासी 'लाल परी'ला पसंती देतात. अनेक गावांमध्ये जाण्यासाठी एसटी बस शिवाय इतर पर्यायच नाही अशीही स्थिती आहे. या साऱ्या गोष्टींचा विचार करुन प्रवाशांचा कल एसटी महामंडळाच्या उत्पन्नात भर टाकू शकतो,



या अनुषंगाने महामंडळाने एप्रिल आणि मे महिन्यात ७८२ वातानुकूलित शिवशाही बसेस चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान या नव्या धोरणानुसार सोडण्यात येणाऱ्या एसी बस या मध्यम आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांचा समावेश असणार आहे. मुंबई सेंट्रल व परळ आगारातून देखील अतिरिक्त गाड्या सोडण्यात येणार आहेत. शिवशाही बसची सेवा मुंबईतून राज्यभरात पुणे, नाशिक, रत्नागिरी, कोल्हापूर, संभाजीनगर, जळगाव, बीड, नागपूर, अहिल्यानगर अशा विविध ठिकाणी सुरू राहणार आहे. उन्हाळी सुट्टीत खासगी ट्रॅव्हल्स वाले प्रवाशांकडून भरमसाट पैसे उकळतात. अशा परिस्थितीत अनेक प्रवासी एसटी बसेस कडे वळतात. त्यामुळे अतिरिक्त शिवशाही बसेसना प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात नजीकच्या काळात २६४० नवीन 'लाल परी' गाड्या दाखल होणार आहेत. दर महिन्याला ३०० गाड्या अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने नवीन एसी लाल परी प्रवाशांच्या सेवेत दाखल केल्या जाणार आहेत. राज्याच्या खेड्यापाड्यातील नागरिकांना याचा फायदा होणार आहे. राज्यातील वाढत्या उष्णतेच्या पाश्र्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर प्रवासी वातानुकूलित बसेसकडे वळत आहेत. प्रवाशांची वाढती मागणी विचारात घेत उन्हाळी सुट्टीत ८७२ शिवशाही बसेस प्रवासी सेवेत धावणार आहेत. तसेच जादा लाल परी गाड्या सोडण्याचेही नियोजन केले जात आहे, अशी माहिती एसटी महामंडळाचे महाव्यवस्थापक नितीन मैंद यांनी दिली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ठाण्यात उन्हाच्या झळांपासून रक्षण करण्यासाठी सिग्नलवर कापडी जाळीचे आच्छादन



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, ठाणे :** उन्हाच्या तीव्र झळांनी ठाणेकर घामाघूम झालेले असताना ठाण्यातील मुख्य सिग्नलवर उन्हाच्या त्रासातून दिलासा मिळण्यासाठी कापडी जाळीचे आच्छादन टाकण्यात आले आहे. वाहन चालकांना सिग्नलच्या प्रतिक्षेत उभे असताना उन्हाचा त्रास जाणवू नये म्हणून ठाणे महानगरपालिकेतर्फे प्रायोगिक तत्वावर गोखले रोडवरून तीन हात नाक्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर हे जाळीचे आच्छादन टाकण्यात आले असून नागपूर आणि पुणे शहरांनंतर ठाण्यात हा प्रयोग करण्यात आला आहे.राज्यात उन्हाचा प्रकोप लक्षात घेता विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. मार्च महिन्यातच उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना अद्याप दोन ते अडीच महिने या उन्हाचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार ठाण्यातील तीन हात नाका सिग्नल येथे कापडी जाळीचे आच्छादन टाकण्यात आहे. एखाद्या समारंभासाठी उभारल्या जाणार्या मंडपासारखी ही रचना असून ही जाळी १०० फूट लांब, २५ फूट रुंद आहे. तिची उंची रस्त्यापासून २० फूट इतकी असून या जाळीमुळे वाहन चालकांना उन्हापासून काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. विशेषत: दुचाकीस्वार आणि सायकल स्वारांना या आच्छादनामुळे सिग्नलवर उन्हापासून संरक्षण मिळणार आहे. दरम्यान येत्या काळात आणखी काही ठिकाणी अशाप्रकारे जाळी उभारण्याचा ठाणे महानगरपालिकेचा मानस आहे. तीन हात नाका सिग्नलवर दीड ते दोन मिनिटे वाहनांना प्रतिक्षा करावी लागते. या काळात अशा उपाययोजनांमुळे ठाणेकरांचा उन्हापासून बचाव होणार आहे.

## एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे यश



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.२३, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** अबॅकस वैदिक गणित व शैक्षणिक क्षेत्रामध्ये सुमारे ४२ वर्षापासून कार्यरत असलेल्या व भारतासह २० देशात हजारो शाखा असलेल्या एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी शाखा अजनुज येथील विद्यार्थ्यांनी ३३ व्या राष्ट्रीय स्तरीय ऑनलाइन परीक्षेत यश प्राप्त केले. ३३ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत अजूनज शाखेच्या संचालिकारेणुका प्रेमराज धस संचलित एवरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी घेतला होता.या स्पर्धेमध्ये कु. अविष्कार कपिल गुंड या विद्यार्थीने राष्ट्रीय स्तरावर केवळ पाच मिनिटांमध्ये १११ गणिते सोडवून पाचवा क्रमांक मिळवला.तर तनिष्क लहू घाडगे या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर दहावा क्रमांक मिळवला. तर चैतन्य गिरमकर, स्वरा सूर्यवंशी, स्वराली जगताप, यश डायबर, सारा शेख, सुफी शेख, यश यादव, देवश्री शेळके, जानवी गिरमकर, आर्यन यादव, ईशान साळुंखे, विराज जगदाळे, निहारिका गिरमकर, अनुष्का गिरमकर, अजिंक्य गिरमकर, मृणाल गिरमकर अंशुमन गिरमकर, अनन्या घाडगे, आयुष घाडगे, तनिष्क घाडगे, क्षितिजा गाडगे अनुष्का गुंड, श्रावणी गिरमकर, श्रेयस गिरमकर, वृषाली गिरमकर, यशश्री गायकवाड, शौर्य गिरमकर, वेदांत जगदाळे या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत यशस्वी झाले. या विद्यार्थ्यांचा वीरपिता नामदेव गुंड मेजर यांच्या अध्यक्षतेखाली सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी वीर पत्नी माधुरी गुंड, उपसरपंच गीता गिरमकर, उपसरपंच अशोक गिरमकर, प्रगतशील शेतकरी संतोष यादव, यशश्री स्कूलच्या संचालिका शुभांगी गायकवाड, मेघना गिरमकर, रेशमा गिरमकर, मनीषा साळुंखे, पुनम घाडगे उपस्थित राहुन पालकांनी अभिनंदन व कौतुक केले. या सर्व विद्यार्थ्यांना एवरेस्ट अबॅकस अकॅडमी अहमदनगरच्या मुख्य संचालिका कल्पना अशोक गडेकर व अजनुज शाखेच्या संचालिका रेणुका प्रेमराज धस यांचे मार्गदर्शन लाभले.

## नव्या भुयारी पुलाला जोड खड्डेमय रस्त्याची १५० मीटरचा रस्ता

### ५० वर्षांपूर्वीची नाली दुरुस्तीला मुहुर्त लागेना



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील सुभाष गंज मोंढा भागातील जिवाजी महाले चौकापासून पासून पश्चिमेस भुयारी पुल मार्गास जोडणारा १५० मीटर रस्ता, मुख्य रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. परिणामी, रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे.

खड्डे पडल्याने खड्यामधील माती, गिट्टी, खडी रस्त्यावर आल्याने सर्वत्र परिसरात धूळ पसरल्याने या ठिकाणाहून ये-जा करताना वाहनधारकांना अपघाताचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे अनेक वर्षांपासून हीच परिस्थिती असून ही नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधी रस्ते कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. अनेक वर्षांपासून रेल्वे गेट वर होणारी वारंवार वाहुतुकीची कोंडी रेल्वे भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहतूक सुरळीत चालू झाली. परंतु शहर व शहराबाहेरील अनेक रस्त्यांना जोडला जाणारा हा मुख्य रस्ता जिवाजी महाले चौकापासून पश्चिमेस अंदाजे १५० मिटर अंतर असुन मोंढा येथील मुख्य बाजार पेठ, गणेश मंदिर, नवि आबादी, भोकर रस्ता, कृषी कार्यालय आदी विविध कार्यालये असून रेल्वे भुयारी मार्ग सुरू झाल्याने हा रस्ता मुख्य रस्ता झाला आहे. नागरिक या रस्त्याचा वापर वाढला आहे.

गेल्या ५० वर्षांपासून या रस्त्याच्या नालीचे रुंदीकरणाचे काम झाले नसल्याने सांडपाणी करण्यास अडथळा येत आहे. या रस्त्यावर जागोजागी खड्डेच खड्डे पडलेले आहेत. अनेक वेळा दुचाकी वाहनांचे छोटे-मोठे अपघात होत आहेत. यांसह रस्त्याचे नव्याने काम न झाल्याने रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. पुन्हा एकदा रस्त्यां-नालीचे काम करून नागरिकांना पूर्ववत् रस्ता करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. याप्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद मुदखेड यांना भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष संजय उर्फ पप्पू सोनटक्के यांनी निवेदन दिले आहे.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्राने दोन्ही संघ जाहीर

## सेरेना म्हसकर, आर्यन पवार यांच्याकडे महाराष्ट्राची धुरा

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२३, मुंबई :** अखिल भारतीय कबड्डी महासंघाच्या मान्यतेने बिहार राज्य कबड्डी असो. च्या विद्यमाने दिनांक २७ ते ३० मार्च २०२५ या कालावधीत होणाऱ्या ३४व्या किशोर व किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धे करीता महाराष्ट्राने आपले दोन्ही संघ आज जाहीर केले. मुंबई उपनगराच्या सेरेना म्हसकर हिच्याकडे किशोरी, तर परभणीच्या आर्यन पवार याच्याकडे किशोर गटाच्या नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली. बिहार, गया येथील जी. डी. गोयंका पब्लिक स्कूल, रसलपूर येथे मॅट वर हे सामने होतील. नुकत्याच मनमाड, नाशिक येथे झालेल्या किशोर व किशोरी गट राज्य





अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हा संघ निवडण्यात आला असून तो मनमाड येथे सराव करीत आहे. निवडण्यात आलेला हा संघ मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक येथून रात्री १० वा. हावडा मेलने स्पर्धेकरिता रवाना होईल. निवडण्यात आलेला हा संघ आज महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. ने एका पत्रकाद्वारे सर्व प्रसार माध्यमांना कळविले आहे.

**निवडण्यात आलेला संघ खालील प्रमाणे -**

**किशोरी गट (मुली) :-** १) सेरेना म्हसकर, संघनायिका (मुंबई उपनगर पूर्व)
२) यशश्री इंगोले (परभणी)
३) बिदिशा सोनार (नाशिक शहर)
४) समृद्धी लांडगे (पिंपरी चिंचवड)
५) प्रतिक्षा राठोड (परभणी)
६) सानिका पाटील (सांगली)
७) सेजल काकडे (नाशिक ग्रामीण)
८) तनुजा ढेरंगे (नाशिक शहर)
९) नंदा नागवे (जालना)
१०) आर्या लवार्डे (पुणे शहर)
११) सिद्धी लांडे (पिंपरी चिंचवड)
१२) ईशा दारोळे (नाशिक शहर)


तसेच प्रशिक्षक शरद पाटील, व्यवस्थापिका क्षिप्रा पैठणकर.

# ॥ क्षयरोग उच्चाटनाचा संकल्प ॥

इ.स.१८८२ साली डॉ.रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञांच्या परिषदेत मांडला आणि त्याला दिनांक २४ मार्च रोजी मान्यता मिळाली. म्हणून दरवर्षी हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. क्षयरोगाला टीबी असंही म्हटलं जातं. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम तयार करण्यात येते. टीबी अथवा क्षयरोग एक संक्रमक आजार आहे. मायक्रो ट्युबरक्लुलोसिस बॅक्टेरियामुळे क्षयरोग होतो. या रोगाचा क्षयरोगग्रस्त रोग्याच्या खोकणे किंवा शिंकणे या माध्यमातून अन्य लोकांमध्ये प्रसार होतो. या रोगाबद्दल योग्य मार्गदर्शन आणि उपचार केल्यास त्याचे निदान होऊ शकते. जर या रोगामध्ये निष्काळजीपणा केला तर त्यामुळे मृत्यू ओढवू शकतो.

जागतिक आरोग्य संघटनेने २०३०पर्यंत या जीवघेण्या आजाराचे जगातून उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी लक्ष निर्धारण आणि नियोजन करण्यात आलं आहे. तर दुसरीकडे भारताने २०२५पर्यंत देशातून या रोगाचे उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार जगभरात दर दिवशी ४ हजार लोकांचा मृत्यू क्षयरोगाने होतो. भारतात क्षयरोगाच्या रुग्णांची संख्या मोठी असून आशियाई देशात भारताचा क्रमांक पहिला आहे. त्यामुळे भारत सरकारच्या वतीने जागतिक आरोग्य संघटनेने ठरवलेल्या लक्षाच्या आधीच देशातून क्षय़रोगाचे उच्चाटन करण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आला आहे. दरवर्षी क्षयरोग दिनाची थीम ठरवली जाते. त्यानुसार मागील वर्षीची थीम येस! वी कॅन एण्ड टीबी. अशी होती. याचाच अर्थ हो, आपण टीबी संपवू शकतो, असा आहे.

२४ मार्च हा दिवस १८८२मध्ये साजरा केला गेला जेव्हा डॉ.रॉबर्ट कोच यांनी बर्लिनच्या इन्स्टिट्यूट ऑफ हायजीन विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या एका छोटया गटाला क्षयरोगाचे कारण, टीबी बॅसिलस शोधून काढल्याची घोषणा करून वैज्ञानिक समुदायाला चकित केले. कोचचे सहकारी, पॉल एहरलिच यांच्या मते, या संस्मरणीय सत्रात, कोच एका घोषणेसह लोकांसमोर हजर झाले ज्याने विषाणूजन्य मानवी संसर्गजन्य रोगाच्या कथेला एक टर्निंग पॉइंट म्हणून चिन्हांकित केले. स्पष्ट, सोप्या शब्दात कोचने एटिओलॉजीचे स्पष्टीकरण दिले. क्षयरोगाची खात्री पटवून देणारे, त्याच्या अनेक सूक्ष्मदर्शकांच्या स्लाइड्स आणि इतर पुरावे सादर करत आहेत. बर्लिनमध्ये कोचच्या घोषणेच्या वेळी क्षयरोग युरोप आणि अमेरिकेत पसरला होता, ज्यामुळे प्रत्येक सात लोकांपैकी एकाचा मृत्यू झाला होता. कोचच्या शोधामुळे क्षयरोगाचे निदान आणि उपचार करण्याचा मार्ग मोकळा झाला. सन १९८२मध्ये रॉबर्ट कोचच्या प्रेझेंटेशनच्या शंभरव्या वर्धापनदिनानिमित्त इंटरनॅशनल युनियन अगेन्स्ट ट्यूबरक्युलोसिस अँड लंग डिसीजने प्रस्तावित केले की २४ मार्च हा अधिकृत जागतिक क्षय दिवस म्हणून घोषित केला जावा. हा आईयूएटीएलडी आणि जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओ द्वारे डेफीट टीबी: नाऊ एंड फॉरएव्हर या थीम अंतर्गत वर्षभर चाललेल्या शताब्दीच्या प्रयत्नांचा एक भाग होता. जागतिक क्षयरोग दिनाला डब्ल्यूएचओच्या जागतिक आरोग्य असेंब्ली आणि युनायटेड नेशन्सने एक दशकानंतर अधिकृतपणे वार्षिक घटना म्हणून मान्यता दिली नाही.



सन १९९५च्या शरद ऋतूत, डब्ल्यूएचओ आणि रॉयल नेदरलँड्स ट्यूबरक्युलोसिस फाउंडेशन-केएनसीव्हीने हेग, नेदरलँड्स येथे पहिल्या जागतिक क्षय दिवस वकिली नियोजन बैठकीचे आयोजन केले होते; एक कार्यक्रम ते पुढील काही वर्षांत सह-प्रायोजक सुरू ठेवतील. सन १९९६मध्ये, डब्ल्यूएचओ, केएनसीव्ही, आईयूएटीएलडी आणि इतर संबंधित संस्था जागतिक क्षयरोग दिनाच्या विविध उपक्रमांसाठी सामील झाल्या होत्या. जागतिक क्षय दिन १९९७साठी डब्ल्यूएचओने बर्लिनमध्ये एक वार्ताहर परिषद घेतली ज्यादरम्यान डब्ल्यूएचओचे महासंचालक हिरोशी नाकाजिमा यांनी घोषित केले की डॉट्स ही या दशकातील सर्वात मोठी आरोग्य प्रगती आहे, त्यानुसार आपण जीव वाचवू शकू. डब्ल्यूएचओचे ग्लोबल टीबी कार्यक्रम संचालक डॉ.अराता कोची यांनी वचन दिले की, आज जागतिक क्षयरोगाच्या साथीची परिस्थिती बदलणार आहे, कारण आम्ही एक प्रगती केली आहे. हे आरोग्य व्यवस्थापन प्रणालीचे यश आहे ज्यामुळे ते शक्य होते. केवळ श्रीमंत देशांमध्येच नव्हे तर विकसनशील जगाच्या सर्व भागांमध्ये क्षयरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी, जिथे सर्व क्षयरोगाच्या ९५ टक्के रुग्ण सध्या अस्तित्वात आहेत. सन १९९८पर्यंत जवळपास २०० संस्थांनी जागतिक क्षयरोग दिनानिमित्त सार्वजनिक उपक्रम राबवले. जागतिक क्षयदिन १९९८च्या लंडनमधील वार्ताहर परिषदेत डब्ल्यूएचओने प्रथमच जगातील सर्वात जास्त क्षयरोगाचे ओझे असलेले बावीस देश ओळखले. पुढच्या वर्षी १९९९च्या जागतिक क्षय दिनाच्या तीन दिवसीय डब्ल्यूएचओ/ केएनसीव्ही नियोजन बैठकीत १८ देशांतील ६० पेक्षा जास्त प्रमुख टीबी वकिलांनी हजेरी लावली होती.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी सन २०००चा जागतिक क्षय दिन साजरा केला. क्लिंटन यांच्या म्हणण्यानुसार, या मानवी शोकांतिका आहेत, आर्थिक संकटे आहेत आणि तुमच्यासाठी संकटांपेक्षा कितीतरी जास्त, ते जगासाठीचे संकट आहेत. रोगाचा प्रसार ही एक जागतिक समस्या आहे ज्यासाठी ... कोणतेही राष्ट्र रोगप्रतिकारक नाही. कॅनडामध्ये नॅशनल कोलॅबोरेटिंग सेंटर फॉर डिटरमिनंट्स ऑफ हेल्थने जागतिक क्षय दिन सन २०१४वर नोंदवले की राष्ट्रीय स्तरावर नोंदवलेले ६४ टक्के टीबी प्रकरणे परदेशी जन्मलेल्या व्यक्तींमध्ये आणि २३ टक्के आदिवासी लोकांमध्ये होती, क्षयरोग हे आरोग्याच्या समानतेच्या चिंतेचे प्रमुख क्षेत्र आहे. आज स्टॉप टीबी पार्टनरशिप, टीबीशी लढा देणाऱ्या संस्था आणि देशांचे नेटवर्क आईयूएटीएलडी एक सदस्य आहे आणि डब्ल्यूएचओचे जिनिव्हामध्ये स्टॉप टीबी पार्टनरशिप सचिवालय आहे, रोगाची व्याप्ती आणि ते कसे टाळावे आणि बरे कसे करावे यावर प्रकाश टाकण्यासाठी या दिवसाचे आयोजन केले जाते.

!! जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने सर्वांना सावधगिरीबद्दल सदिच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**९४२३७१४८८३.**

# आ.पाटील यांचे मध्यस्थीने पंढरपूरात सुरू असलेले ऊसतोड वाहतूकदारांचे उपोषण स्थगित

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२३, पंढरपूर :** ऊसतोड मजुरांचे माध्यमातून कारखान्यांना ऊसतोड पुरवठा करताना ट्रॅक्टर मालक हे मुकादमांना मध्यस्थ धरून मजुरांची टोळी करतात टोळी करीत असताना लाखो रुपयांचा अर्थिक व्यवहार मुकादम आणि वाहन मालक यांच्यात होत असतो मात्र काही मुकादमांकडून वाहनमालकांची मोठ्या प्रमाणात फसवणुक केली जात असल्याच्या घटना घडत आहे.

यामध्ये फसवणुक झालेल्या वाहन मालकांना न्याय मिळावा आणि संबंधित मुकादमांना अटक करावी या मागणीसाठी पंढरपूरात तहसील कार्यालयासमोर स्वाभिमानी ऊसतोड वाहतूक संघटनेच्यावतीने सुरू असलेल्या उपोषणकर्त्यांची माढा




मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी भेट घेऊन आपण तुमच्यासोबत कायम असुन फसवणुक झालेल्या वाहन मालकांना न्याय मिळण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगून हे उपोषण थांबविण्यात आले.

याप्रसंगी बोलताना आमदार अभिजीत पाटील म्हणाले गेल्या काही वर्षात महाराष्ट्रामध्ये जे ऊस वाहतूकदार आहेत त्यांची मोठ्या प्रमाणावर टोळी मुकादमांकडून फसवणूक होत आहे राज्यात जो ऊस वाहतूकदार करणारा वर्ग आहे तो छोटा शेतकरी आहे शेतामध्ये मशागतीसाठी घेतलेला ट्रॅक्टर कारखाने सुरू झाल्यानंतर त्याच्या माध्यमातून ऊस वाहतुकीसाठी लावत असतो त्यातून मिळणाऱ्या उत्पादनामधून उपजीविका करीत असतो एक दोन एकर शेती असलेला हा शेतकरी उसाची वाहतूक करतो आणि बाहेरून ऊसतोड मजूर पुरविणारा मुकादम हे २० लाख ते २५ लाख रुपये बिनव्याजी आडवांस घेत असतो हे मुकादम अॅडव्हान्स घेऊन आणि करार केल्यानंतरही मजूर पुरवित नाहीत त्यामुळे फसवणूक होत आहे.

परिणामी राज्यात फसवणूक झालेल्या काही ऊस वाहतूकदार यांनी आत्महत्याही केली आहे या ऊस वाहतूकदारांची फसवणूक होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाय योजना सरकारने करावी यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिक्षक माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यासह अनेक ठेकेदार व नागरिक उपस्थित होते.

# तुर्भे येथील शास्त्रोक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थळाची आयुक्तांकडून पाहणी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, तुर्भे (नवी मुंबई) :** घनकचरा व्यवस्थापन प्रणालीमध्ये प्रक्रिया प्रकल्प स्थळ अत्यंत महत्वाचे असून नवी मुंबई महानगरपालिकेचा तुर्भे एमआयडीसी येथे असलेला शास्त्रोक्त भूभरणा पद्धतीवर आधारित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प देशातील उत्तम प्रकल्पांपैकी मानला जातो.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' परीक्षणास सुरूवात झाली असून त्या पार्श्वभूमीवर आज महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यासह घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थळाची बारकाईने पाहणी केली.

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये नवी मुंबई महानगर पालिकेचा समावेश सुपर स्वच्छ लीगमध्ये झालेला असून नवी मुंबईचे मानांकन उंचाविण्यासाठी लोकसहभागातून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थळावरील प्रक्रिया ही महत्वाची असून त्यादृष्टीने आयुक्तांनी प्रकल्प स्थळावरील अंतर्गत स्वच्छतेवर अधिक भर देण्याचे निर्देश दिले. तेथे मोकळया जागांवर काही ठिकाणी मोठया प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले असून आणखी मोकळया जागा शोधून तेथे ही वृक्षारोपण करण्याच्या सूचना आयुक्तांमार्फत देण्यात आल्या. या ठिकाणी वृक्षारोपण करताना आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली जैवविविधतेला पूरक अशा देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली असून त्यामध्येही बांबूची मोठया प्रमाणावर लागवड करण्यात आलेली आहे. त्या जागेची पाहणी करून आयुक्तांनी समाधान व्यक्त केले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात दररोज साधारणत: ७५० मेट्रीक टन कचरा निर्माण होत असून तो तुर्भे येथील महानगरपालिकेच्या शास्त्रोक्त भूभरणा पध्दतीवर आधारित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी आणण्यात येऊन त्यावर प्रक्रिया करण्यात येते. त्यामधील ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती केली जाते तसेच सुक्या कचऱ्यापासून आरडीएफ बनवून रासायनिक उद्योग, सिमेंट उद्योग, थर्मल पॉवर स्टेशनला दिले जाते.



त्याचप्रमाणे यामधील नारळाच्या रिकाम्या शहाळ्यांपासून कोकोपीट वेगळे काढले जाते. त्याच उपयोग नर्सरी व फुलबागा याठिकाणी होतो. तसेच त्यामधील फायबर वेगळे काढले जाऊन त्याचाही उपयोग गादीच्या कुशनमध्ये व मूर्ती बनविण्यासाठी केला जातो. त्यासोबतच काथ्याची निर्मिती ही करण्यात येते. याशिवाय एमआरएफ रिसायकलींग इंडस्ट्रीला पाठविले जाते.

आपल्या शहरातील घनकचऱ्यावर कशा पध्दतीने शास्त्रोक्त प्रक्रिया होते याची नागरिकांना विशेषत्वाने लहान मुलांना माहिती व्हावी यादृष्टीने शालेय विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी आणून त्यांना अभ्यासाच्या दृष्टीने माहिती करुन द्यावी. अशा ही सूचना आयुक्तांमार्फत करण्यात आल्या.

या ठिकाणी असलेले बांधकाम व पाडकाम घनकचरा प्रक्रिया स्थळ अधिक उत्तम व सक्षम करण्यासाठी सुरु असलेली कार्यवाही जलद करावी तसेच यामध्ये सामाजिक सहभागाचा अंतर्भाव करावा असेही निर्देश आयुक्तांनी दिले. त्यासोबतच त्याठिकाणी निर्माण होणारे क्रशींग सँड, विविध आकाराची रेती व खडी, पेव्हर ब्लॉक असे बांधकाम साहित्य महापालिका कामांमध्ये कंत्राटदारांनी वापरावे यादृष्टीने नियमावली करावी अशाही सूचना आयुक्तांनी दिल्या.

त्याचप्रमाणे कचऱ्यापासून वीजनिर्मिती आणि कचऱ्यापासून गॅस निर्मिती याबाबतच्या नियोजित प्रकल्पांची कार्यवाही गतीमानतेने करावी असेही आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वच्छतेमधील मानांकन अग्रभागी राखण्यात तुर्भे येथील शास्त्रोक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थळाचा महत्वाचा भाग असून हे प्रकल्प स्थळ नवनवीन तंत्रप्रणाली राबवित अधिकाधिक अत्याधुनिक करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करण्यात येत आहेत.

# बॅडमिंटनमध्ये सुवर्ण पदकाची हुलकावणी

## सुकांत कदम, प्रेमकुमार आले, आरती पाटील यांचे रौप्यपदकांवर समाधान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नवी दिल्ली :** खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये बॅडमिंटनचा विचार करता दि.२२ मार्च २०२५ रोजी दिवस महाराष्ट्रासाठी काहीसा निराशेचा ठरला. यात अंतिम फेरी गाठून ही तीन खेळाडूंना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.




पॅरा ऑलिम्पिक पदकविजेता सुकांत कदम याच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती. पण अंतिम फेरीत त्याला तमिळनाडूच्या नवीन शिवकुमारकडून १५-२१, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.

सामन्यानंतर सुकांत म्हणाला, नवीन ने चांगली तयारी केली होती. माझी तयारी कमी पडली. त्याने माझे कच्चे दुवे हेरून नियोजनबद्ध खेळ केला. त्याने फ्लॅट शॉट मारण्याची युक्ती वापरली. त्याला योग्य प्रत्युत्तर देणे मला जमले नाही. आजचा दिवस त्याचा होता.

सुकांत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या तर नवीनकुमार सहाव्या क्रमांकावर आहे.आतापर्यंत उभय खेळाडू तीनदा आमने सामने आले. यापैकी नवीन दोनदा तर सुकांत एकदा यशस्वी ठरला आहे.येत्या काळात एशियन चॅम्पियनसाठी तयारी करणार असल्याचे सुकांतने सांगितले.

व्हीलचेअर गटात प्रेमकुमार आले याला उत्तर प्रदेशच्या शशांककुमारने पराभूत केले. ही लढत शशांककुमारने २१-१२, २१-१५ अशी जिंकली. आरती पाटील पॅरालिम्पिक खेळाडू मनीषा रामदास हिच्याकडून २१-५, २१-४ असा पराभव स्वीकारावा. मनीषाच्या वेगवान आणि अष्टपैलू खेळासमोर २८ वर्षीय आरती पूर्णपणे अपयशी ठरली.

# छत्रपती संभाजीनगर पोलिसांना नवीन ३३ वाहनांचा ताफा

## पोलीस दल अधिक बळकट करण्यावर भर - पालकमंत्री शिरसाट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, छ.संभाजीनगर :** जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि पोलिसांना अत्याधुनिक साधन-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने ५ कोटी रुपयांच्या निधीतून ३३ नव्या वाहनांची खरेदी करण्यात आली आहे.



या वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. अत्याधुनिक सुविधा, साधने उपलब्ध करून पोलीस दल अधिक सक्षम व बळकट करण्यावर शासनाचा भर असल्याचे यावेळी पालकमंत्री शिरसाट यांनी जाहीर केले. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्याला खासदार डॉ. कल्याण काळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. वीरेंद्र राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, राजेंद्र जंजाळ, नंदकुमार घोडेले आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी पोलिसांना सक्षम बनवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. गुन्हेगारीच्या निर्मूलनासाठी आणि शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना आवश्यक ती साधने पुरविली जातील. पोलिसांनी जबाबदारीने काम करावे आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळवून द्यावा, असे सांगितले.

पोलीस दलाला नवीन ३३ वाहने

पोलीस अधीक्षक कार्यालय : १० वाहने

पोलीस आयुक्त कार्यालय : १५ वाहने

राज्य राखीव पोलीस दल : ८ वाहने (यात एका बसचा समावेश)

यावेळी पोलिसांसाठी अँम्ब्युलन्स देण्याचाही निर्णय जाहीर करण्यात आला. पोलिसांचे मनोबल वाढवण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असेही मंत्री शिरसाट यांनी सांगितले. आगामी काळात आणखी ३० वाहने पोलिसांना देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी जाहीर केले. पोलीस दलाच्या या आधुनिकीकरणामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, तसेच गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. खा.डॉ. कल्याण काळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर हिरवी झेंडी दाखवून नवीन वाहने पोलीस दलात समाविष्ट करण्यात आली.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नांदेड विमानतळावर स्वागत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नांदेड :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज एक दिवसाच्या दौऱ्यासाठी श्री. गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन झाले. यावेळी त्यांच्यासोबत प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, माजी मंत्री नवाब मलिक यांचे ही आगमन झाले.



यावेळी त्यांचे आमदार विक्रम काळे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार राजू नवघरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, राज्य उत्पादन शुल्कचे नांदेड विभागाचे विभागीय उपायुक्त डॉ.बी.एच.तळवी, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर आणि विविध पदाधिकारी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यामधील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी ते नांदेड जिल्ह्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आले आहेत.

# थोडक्यात

## राजमाता जिजाऊ पुरस्कार प्राप्त कीर्तनकार सुरेखाताई शिंदे विविध संघटनांकडून सन्मानित

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, कळंब (आंबेगाव) :** शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर किल्ले शिवनेरीवर, शिवनेरी स्मारक समितीच्या वतीने, आपल्या समाजातील सर्वांच्या परिचित अशा कळंब ता.आंबेगाव येथील प्रसिद्ध कीर्तनकार तथा आंबेगाव तालुका वारकरी साहित्य परिषदेच्या अभ्यासू महिला अध्यक्षा ह.भ.प. सुरेखाताई शिंदे यांना महाराष्ट्र राज्याचे मच्छोद्योग मंत्री नामदार नितेश राणे आणि किल्ले शिवनेरी जुन्नर तालुक्याचे लोकप्रिय, कार्यसम्राट आमदार शरददादा सोनवणे यांच्या शुभहस्ते राजमाता जिजाऊ पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. हेच औचित्य साधून पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुका सलून असोसिएशनचे उपाध्यक्ष/भीमाशंकर नाभिक धर्मशाळेचे विश्वस्त रत्नाकरराव कोराळे आणि आप्पासाहेब खंडागळे सामाजिक कार्यकर्ते यांच्या संकल्पनेतून आज ह.भ.प सुरेखाताई शिंदे यांचा सन्मान, महाराष्ट्र राज्याचे ज्येष्ठ नेते, आळंदी नाभिक धर्मशाळाचे उपाध्यक्ष शंकरराव रायकर, महाराष्ट्र नाभिक महामंडळ पश्चिम विभाग उपाध्यक्ष गणपतराव क्षीरसागर, आळंदी नाभिक धर्मशाळा विश्वस्त सदाशिव तात्या राऊत, विश्वस्त महादेवराव मंडलिक, भीमाशंकर नाभिक धर्मशाळा विश्वस्त, विश्वस्त चंद्रकांतशेठ भालेकर, विश्वस्त रामदास शिंदे, विश्वस्त विनायकराव क्षीरसागर, सचिव- नितीन कुटे पिंपरी चिंचवड, शिरूर तालुका नाभिक महामंडळ माजी अध्यक्ष अर्जुनराव शिंदे, खेड तालुका ज्येष्ठ नेते अध्यक्ष ह.भ.प. खंडूशेठ राऊत, अध्यक्ष ह.भ.प.माऊली महाराज राऊत, खेड तालुका सलून असोशियन उपाध्यक्ष उमेशराव राऊत, आप्पासाहेब खंडागळे, विनायकराव कोराळे आंबेगाव तालुका युवक नेते तसेच परिसरातील सन्माननीय समाज बांधवांच्या उपस्थितीत अनेक मान्यवरांच्या शुभ हस्ते यावेळी सन्मान करण्यात आला.




## बोईसरवासीयांना एस.आर.ए च्या योजनेअंतर्गत घरे द्या - आमदार तरे

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२२, पालघर :** पालघर मधील बोईसरवासीयांना मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एस.आर.ए) च्या योजनेअंतर्गत घरे द्या. अशी मागणी बोईसर विधानसभेचे आमदार विलास तरे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेत मागली केली आहे. यावेळी आमदार तरे यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन २०२५ - २६ च्या गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांवर अनुदानावर चर्चेत भाग घेत म्हणाले की, माझ्या बोईसर मतदारसंघातील बोईसर ग्रामपंचायत ही राज्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असून जवळपास १ लाख ३० हजार लोकसंख्या असलेली ही ग्रामपंचायत मोठ्या शहरांप्रमाणे विकसित होत आहे. सन २०१० पासून येथे एसआरएच्या योजनेअंतर्गत पुनर्विकास करण्याची मागणी मी सातत्याने करत आहे. याबाबत शासनाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला असून, बोईसर ग्रामपंचायतीचा समावेश एसआरए योजनेत करण्यात आला असून बोईसर ग्रामपंचायत हद्दीतील भिमनगर, दिवाकर चाळ, भैयापाडा, दत्तवाडी, रफाई मोहल्ला, दांडीपाडा, लोखंडीपाडा, यादव नगर, धनानी नगर, गणेश नगर, सुतारपाडा, होळीपाडा, वंजारीपाडा, काटकर पाडा, काठेपाडा, बोईसर मार्केट, शीरामनगर या एकूण ११ झोपडपट्टीत साधारण ११९७५ झोपडपट्टी असून यामध्ये साधारण ६० हजार लोकसंख्या आहे. तरी हा प्रकल्प शासनाकडे प्रस्तावित केला असून तात्काळ मंजुरी करून येथील लोकांना स्वतः चे हक्काचे घरे देण्याकरिता शासनाने या भागासाठी १.४ भूनिर्देशांक (FSI) मंजूर केला असला, तरी वाढीव ४ भूनिर्देशांक (FSI) मिळाल्यास अधिक प्रभावी आणि चांगला पुनर्विकास साधता येईल. त्यामुळे या भागाचा दर्जा सुधारेल, सार्वजनिक सुविधा उत्तम मिळतील आणि रहिवाशांचे जीवनमान उंचावेल. या प्रकल्पासाठी तातडीने वाढीव भूनिर्देशांक (FSI) मंजूर करून येथील ग्रामस्थांना स्वतः चे हक्काचे घर द्यावे. अशी मागणी सभागृहात करत त्यांनी छत अपनी हो, तो सपनों में रंग भरते हैं, हर दीवार पर उम्मीद के चिराग जलते हैं।असे पत्रकारांशी बोलताना सांगत बोईसरच्या विकासाला नवी दिशा मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या योजनेद्वारे पुनर्विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा राहणार असे आमदार विलास तरे यांनी सांगितले.



## शेकडो बौद्ध अनुयायी नांदेडच्या बुद्धगया मुक्ती आंदोलनात सहभागी होणार

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२२, मुदखेड (नांदेड) :** बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले विहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी नांदेड येथे येत्या दिनांक २५ मार्च २०२५ रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय- सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केलेले आहे.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्ध विहार गेली वर्षांनुवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापन यावर ताबा घेऊन मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल अ‍ॅक्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. त्यामुळे सदर कायदा तात्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी भारतभर बौद्ध भिक्खू आणि अनुयायींना व्यापक आंदोलन छेडले आहे. बुद्धविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदेड जिल्ह्यात मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. नांदेडच्या कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान नवीन मोंढा नांदेड येथे दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायींचा जमाव जमणार आहे. नवा मोंढा मैदान येथून महामोर्चाची सुरुवात होणार असून नियोजित भगवान बुद्ध पुतळा, महात्मा फुले पुतळा, शिवाजीनगर, कलामंदिर, वजीराबाद चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय असा महामोर्चाचा मार्ग राहणार आहे. महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पोहोचल्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे. मुदखेड शहर व तालुका परिसरातून बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होणार आहेत.